## प्रकरण :- तिसरे

# नांदेड जिल्हा एक दृष्टिक्षेप

---

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण :- तिसरे | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **3. नांदेड जिल्हा एक दृष्टिक्षेप** | 64-89 |
| 3.1 | प्रास्तविक | 65 |
| 3.2 | भारत | 65 |
| 3.3 | महाराष्ट्र | 66 |
| 3.4 | मराठवाडा | 67 |
| 3.5 | नांदेड जिल्हा | 72 |
| 3.5.1 | स्थान व क्षेत्रफळ | 73 |
| 3.5.2 | लोकसंख्या | 74 |
| 3.5.3 | हवामान | 78 |
| 3.5.4 | नद्या व धरणे | 78 |
| 3.5.5 | जमीन | 79 |
| 3.6 | वनसंपत्ती | 79 |
| 3.8 | नांदेड जिल्हयातील महत्वाची प्रमुख ठिकाणे | 81 |
| 3.9 | नांदेड जिल्हयातील उच्च शिक्षण | 83 |

# प्रकरण - तिसरे

# नांदेड जिल्हा - एक दृष्टिक्षेप

**3.1 प्रास्ताविक :**

आपण जेव्हा एखादया विषयाचा अभ्यास करतो तेव्हा तो विषय कोणत्या प्रदेशांशी संबंधीत आहे. त्या प्रदेशाची भौगोलिक रचना, सांस्कृतिक परंपरा, इतिहास, औद्योगिक-शैक्षणिक-व्यावसायिक वातावरण, दळणवळणाची साधने, रस्ते, वीज, पर्यावरण अशा प्रकारच्या मुलभूत सोयिसुविधाचा परिणाम अभ्यास विषयांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या होत असतो. म्हणून भौगोलिक प्रदेशाची माहिती करून घेणे महत्वाचे असते.

पृथ्वीवरील जमीनीचे क्षेत्रफळ 14,83,00,000 चौ. की. मीटर आहे.जगाची विभागणी सात खंडामध्ये झाली. जगात सर्वात मोठा देश रशिया हा आहे तर वेटीकन सीटी हा सर्वात लहान देश आहे. जगाची लोकसंख्या 2003 साली 641 कोटी होती. त्यात वार्षिक 2% टक्के दराने वाढ हाते. जगात चीन 127 कोटी, भारत 104 कोटी, अमेरिका 27 कोटी, इंडोनशिया 21 कोटी हे जास्त लोकसंख्या असलेले देश आहे. गरीब देशाची लोकसंख्या वाढीचा दर 2.5 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आहे. तर प्रगत देशाची लोकसंख्या एक टक्क्यापेक्षा कमी दराने वाढत आहे.

**3.2 भारत :**

आशिया खंडामध्ये हिमालय व जगातील सर्वोच्च पवर्ततरांगाच्या पायथ्याशी अरबी समुद्र, हिंदी महासागर व बंगालचा उपसागर यातील समुद्रातील वेढलेले जगातील सर्वात मोठे, व्दिपकल्प म्हणजे भारत, 15 ऑगस्ट 1947 रोजी ब्रिटिशाच्या पारतंत्र्यातून मुक्त झला. उत्तर गोलार्धात 8.21 ते 37.6

अध्यादेशाच्या दरम्यान व पुर्व गोलार्धात 68.7 ते 97.3 या रेखाशांच्या दरम्यान असणारे क्षेत्रफळ 32,87,263 चौ. कि. मी. आहे. भारताला 7517 कि.मी लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. बंगालच्या उपसागरात अंदमान व निकोबार बेटांचा समुद्र व अरबी समुद्रात लक्षव्दिप बेटांचा समुह हा भारताचा अविभाज्य भाग होय. पश्चिमेकडे अरबी समुद्र अणि पाकिस्तान वायव्य व उत्तरेकडे, म्यानमार आणि बंगालचा उपसागर दक्षिणेकडे श्रीलंका आणि हिंदी महासागर ही भारताची चतु:सीमा होय.

जगाच्या 2.4 टक्के भूभाग भारताने व्यापल्याने भारतात जगाच्या तुलनेत 16 टक्के लोकसंख्या भारतात सामावलेली आहे. जगात लोसंख्येच्या संदर्भात भारताचा दुसरा क्रमांक लागतो. इ.स.2003 मध्ये भारताची लोकसंख्या 104 कोटी  होती. भारतात जिल्हयाची संख्या 600 आहे. मानववस्ती असलेल्या खेडयांची संख्या 6.05 लक्ष आहे. एकूण क्षेत्रफळापैकी 38.7 टक्के जमीन आहे. भारतात लोहमार्ग 63028 कि.मी. ,रस्ते वाहतुक 58,112 कि.मी., जल वाहतुक 14500 कि.मी.लांबीचे मार्ग आहेत. देशात 176 राष्ट्रीय महामार्ग आहेत. देशात एकूण 12 मोठी आणि 189 छोटी बंदरे आहेत. 12 आंतरराष्ट्रीय विमानतळ व 112 इतर विमातळ आहेत.

**3.3 महाराष्ट्र**

महाराष्ट्र हे भारतामधील 28 घटक राज्यापैकी औद्योगिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्टया विकसित असे एक महत्वाचे राज्य आहे. भारताच्या दख्खन पठारावर मध्यवर्ती भागात उत्तर भारत व दक्षिण भारत यांना एकत्रित आणणारी विशाल भूमी म्हणजे महाराष्ट्र राज्य होय. महाराष्ट्रात विविध प्रदेशात भौगोलिक विविधतेबरोबरच प्रादेशिक विविधता आढळते.

1 मे 1960 रोजी मराठवाडा, विदर्भ, कोकण, खाणदेश आणि पश्चिम महाराष्ट्र यांचा समावेश असलेल्या सलग महाराष्ट्राची निर्मिती झाली. निर्मिती वेळी महाराष्ट्रात 26 जिल्हे आणि 235 तालुके होते. सध्या महाराष्ट्रात 35 जिल्हे व 357 तालुके आहेत. प्रशासकीय कामकाजाच्या सुलभतेसाठी माहराष्ट्राचे कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर अशा सहा विभागात विभाजन केलेले आहे.

क्षेत्रफळाच्या दृष्टीकोनातून राजस्थान व मध्यप्रदेश यांच्यानंतर महाराष्ट्राचा भारतात तिसरा क्रमांक आहे. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ 3,07,713 चौ.कि.मी. आहे. महाराष्ट्राचा अक्षवृत्तीय विस्तार 15.4 उत्तर अक्षवृत्त ते 22.6 असून रेखावृत्तीय विस्तार 72.66 पूर्वरेखावृत्त ते 80.54 पूर्व रेखावृत्त आहे. साधारणत: त्रिकोणावृत्ती आकार लाभलेल्या महाराष्ट्राची पूर्व-पश्चिम लांबी सुमारे 800 कि.मी. असून दक्षिणोत्तर रूंदी सुमारे 720 कि.मी. आहे. महाराष्ट्राच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मधप्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेस आंध्रप्रदेश दक्षिणेस कर्नाटक व गोवा राज्याच्या सीमा लाभल्या आहेत.

## 3.4 मराठवाडा :

मराठवाडा हे प्रादेशिक नाव असून तो महाराष्ट्र राज्याचा एक प्रशासकीय विभाग आहे. भौगोलिक घटकाचा विचार केल्यानंतर मराठवाडा हा महारष्ट्रातील एक स्वयंपूर्ण भौगोलिक एकक मानावा लागतो. सहयाद्रिच्या अनेक लहान माठया रांगा मराठवाडाभर विखुरलेल्या दिसतात. याच पर्वतरांगानी मराठवाडयाच्या तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये मोलाची भर घातलेली आहे. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या भूप्रदेशाला मराठवाडा हे नांव प्राप्त झाले. हे नाव आजही कायम असून मराठवाडा हा महाराष्ट्र राज्याचा एक प्रशासकीय विभाग आहे.

मराठवाडा या विभागात औरंगाबाद,जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर व उस्मानाबाद या आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. मराठवाड्याला प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा वारसा लाभलेला असून देशाचा व संस्कृतीच्या जडणघडणीत मराठवाडयाचा महत्वाचा वाटा आहे. जगप्रसिध्द असलेल्या वेरूळ व अजिंठा येथील लेणी मराठवाडयातच आहे.[1]

**सारणी क्र. 3.1**

**मराठवाड्यातील जिल्हा निहाय क्षेत्रफळ दर्शविणारी सारणी**

**( 2001 च्या आकडेवारीनुसार)**

| अ.क्र. | जिल्हा | क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) |
|---|---|---|---|
| 1 | औरंगाबाद | 10106 | 15.59 |
| 2 | जालना | 7715 | 11.90 |
| 3 | परभणी | 6511 | 10.05 |
| 4 | हिंगोली | 4526 | 6.98 |
| 5 | बीड | 10692 | 16.50 |
| **6** | **नांदेड** | **10545** | **16.27** |
| 7 | उस्मानाबाद | 7550 | 11.64 |
| 8 | लातूर | 7166 | 11.05 |
| | **एकूण** | 64811 | 100.00 |

संदर्भ : दृष्टिक्षेपात औरंगाबाद विभाग, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद, (2008)

बीड जिल्हाचे क्षेत्रफळ सर्वात जास्त आहे. तर नव्याने निर्माण झालेला हिंगोली जिह्ृयाचे सर्वात कमी क्षेत्रफळ आहे. बीड जिल्हा क्षेत्रफळात मोठा असला तरी अर्थिकदृष्टया मागासलेला आहे.

राज्यातील एकुण लोकसंख्येपैकी 15.5 % लोकसंख्या व भूप्रदेशापैकी 20.96 भूप्रदेशाचा मराठवाडयात अंतर्भाव होतो. नैसर्गिक कारणाने व निजामशाहीच्या संरजामी राजवटीत 200 वर्ष राहिल्यामुळे हा प्रदेश कायम स्वरूपी मागासलेला राहिलेला आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेत ही प्रादेशिक विषमता दूर करण्याचा सर्वात मोठा प्रयत्न करण्यात आला आहे. [2]

**आलेख क्र. 3.1**

**मराठवाड्यातील जिल्हा निहाय क्षेत्रफळ दाखविणारा आलेख**




**मराठवाड्यातील जिल्हे क्षेत्रफळ व लोकसंख्या :**

मराठवाडयातील जिल्हयाचे क्षेत्रफळ व त्यांची लोकसंख्या पुढील सारणीत दर्शविलेली आहे.

## सारणी क्र. 3.2

## मराठवाड्यातील जिल्हे क्षेत्रफळ व लोकसंख्या

| अ.क्र. | जिल्हयांचे नाव | क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | लोकसंख्या (लाख) | तालुके |
|---|---|---|---|---|
| 1 | हिंगोली | 4524 | 987160 | 05 |
| 2 | परभणी | 6517 | 1527175 | 09 |
| 3 | लातूर | 7157 | 2080285 | 10 |
| 4 | उस्मानाबाद | 7569 | 1486586 | 08 |
| 5 | जालना | 7718 | 1612980 | 08 |
| 6 | औरंगाबाद | 10106 | 2897013 | 09 |
| 7 | नांदेड | 10528 | 2876259 | 18 |
| **8** | बीड | 10692 | 2161250 | 11 |
| | **एकूण** | **64811** | **15628708** | **76** |

संदर्भ स्त्रोत :-महाराष्ट्र शासन, 2004, नांदेड जिल्हा आर्थिक व सामाजिक विश्लेषण, प्रकाशन, मुंबई

## आलेख क्र. 3.2

## मराठवाड्यातील जिल्हे क्षेत्रफळ व लोकसंख्या दर्शविणारा आलेख



**हिंगोली :-**

हिंगोली जिल्ह्याचे क्षेत्रफळ 4524 चौ. कि.मी. असून जिल्ह्याची लोकसंख्या 987160 लाख आहे. जिल्ह्यात पाच तालुक्याचा समावेश आहे.

1 मे 1999 रोजी परभणी जिल्ह्याचे विभाजन करून हिंगोली जिल्हा निर्माण करण्यात आला. हिंगोली ठिकाण कयाधू नदीच्या काठी वसले आहे. संत नामदेवाचा जन्म हिंगोली जिल्ह्यातील नरसी बामणी या गावी झाला असून संत नामदेव विठोबा खेचर वास्तव्य या पावनभूमीत होते. हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथे संत नामदेव व त्यांचे गुरु विठोबा खेचर या गुरूशिष्यांची समाधी आहे. हिंगोलीस मराठवाडयातील एक महत्वाचे व्यापारी केंद्र म्हणून महत्व आहे येथील दसरा महोत्सव प्रसिध्द आहे. [3]

**परभणी**

परभणी जिल्ह्याचे क्षेत्रफळ 6517 चौ.कि.मी. असून जिल्ह्याची लोकसंख्या 1527715 लाख आहे. तर या जिल्ह्यात एकूण 9 तालुके आहेत. या जिल्ह्याचे 1 मे 1999 साली विभाजन करून यातुन हिंगोली या नवीन जिल्ह्याची स्थापना झाली. या जिल्ह्यात मराठवाडा कृषी विद्यापीठ असून दुरदर्शन प्रक्षेपण केंद्र, आकाशवाणी उपकेंद्र, सुतगिरण्या, तेलगिरण्या, दुध डेअरी आहेत. या शहरात सय्यद शाह तुराबुल हक दर्गा असल्यामुळे येथे उरूस भरतो .याचप्रमाणे खंडोबाची यात्रा भरते. [4]

**लातूर**

लातूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ 7157 चौ.कि.मी. असून जिल्ह्याची लोकसंख्या 2080285 लाख आहे. एकूण दहा तालुके आहेत. लातूर शहराच्या इतिहासात रत्नापूर महात्म्य मध्ये विश्लेषण केले आहे. आठव्या शतकात या शहरास लत्तलूर असे म्हटले जात असे त्याचा अपभ्रंश लातूर असा झाला असे म्हटले

जाते.लातूर हा उस्मानाबाद जिल्ह्याचा भाग होतो. 16 ऑगस्ट 1982 साली स्वतंत्र लातूर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. मराठवाडयातील विद्येचे माहेरघर, जिनिंग व प्रेसिगचे कारखाने, सुतगिरणी, तेलगिरण्या आहेत. येथील गंजगोलाई मध्यवर्ती बाजारपेठ असून या वर्तुळाकार बाजारपेटेला अकरा रस्ते येवून मिळतात. [5]

**उस्मानाबाद**

उस्मानाबाद जिल्ह्याचे क्षेत्रफळ 7569 चौ.कि.मी. असून जिल्ह्याची लोकसंख्या 1486586 लाख आहे. तर उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण आठ तालुके आहेत. [6]

उस्मानाबाद जिल्ह्याचे मुळ नाव धाराशिव असे होते. 1982 मध्ये या जिल्ह्याचे विभाजन करून लातूर व धाराशिव असे दोन भाग करण्यात आहे. उस्मानाबाद हा जिल्हा मराठवाडयात नैऋत्य दिशेस आहे. इ.स. 1910 मध्ये निजाम मीर उस्मान अली हा सत्तेवर येताच या शहरास स्वत:चे नाव दिले. तेव्हापासून या शहराचे उस्मानाबाद असे नाव पडल. उस्मानाबाद शहराजवळील डोंगरात कारीव लेणी प्रसिध्दी आहेत. औद्योगिकदृष्ट्या अविकसित जिल्हा म्हणून उस्मानाबाद जिल्ह्याकडे पाहिले जाते. [7]

**जालना**

जालना जिल्ह्याचे क्षेत्रफळ 7718 चौ.कि.मी. असून जिल्ह्याची लोकसंख्या 1612980 लाख आहे. तर जालना जिल्ह्यात एकूण आठ तालुके आहेत. 1 मे 1981 रोजी जालना जिल्हा अस्तित्वात आला.

जालना हे शहर असून ते कुंडलिका नदीच्या तीरावर मनमाड-काचीगुडा लोहमार्गावर वसलेले आहे. जालना शहरातील बाजारपेठ ही प्रमुख बाजारपेठ मानली जाते. जालना जिल्ह्यातील भोकरदन हे ठिकाण प्राचीन

अवशेषासाठी प्रसिध्द आहे. जालना जिल्ह्यातील जांब हे ठिकाण समर्थ रामदास स्वामीचे जन्मस्थळ आहे. [8]

**औरंगाबाद**

औरंगाबाद जिह्याचे क्षेत्रफळ 10106 चौ.कि.मी. असून संपूर्ण जिल्ह्याची लोकसंख्या 2897013 लाख आहे. जिल्ह्याचे विभाजन एकूण 9 तालुक्यात करण्यात आले आहे. मध्ययुगीन कालखंडात यादवांची सत्ता होती असा स्पष्ट पुरावा मिळतो. औरंगजेब बादशहाच्या नावावरून औरंगाबाद असे नांव पडले. या शहराचे पूर्वीचे नाव खडकी असे होते. मलिक अंबर याने इ.स. 1605 मध्ये या शहराची स्थापना केली. इ.स.1629 मध्ये या शहराचे नांव फत्तेपूर असे ठेवले होते. पुढे 1653 मध्ये दक्षिणेचा सुभेदार म्हणून औरंगजेबाची नियुक्तीण झाल्यानंतर या शहराला औरंगाबाद असे नाव पडले. [9]

**बीड**

बीड जिल्ह्याचे क्षेत्रफळ 10692 चौ.कि.मी. आसून जिल्ह्याची लोकसंख्या 2161250 लाख आहे. तर बीड जिल्ह्यात एकूण 11 तालुके आहेत.

बिंदुसरा नदीच्या खोऱ्यात बिळासारख्या खोलगट ठिकाणी हे शहर वसले असल्याने बील शब्दावरून बीड हे पडले असावे असे मत मांडले जाते. बीड येथील खंडेश्वरी मंदिर व कंकालश्वेर मंदीर प्रसिध्द आहे. हे मंदीर तलावाच्या मधोमध असून प्रेक्षणीय आहे. दुरदर्शन व आकाशवाणी केंद्र आहे. औद्योगिकदृष्ट्या हा जिल्हा अविकसित म्हणून समजला जातो. [10]

**3.5 नांदेड जिल्हा**

नांदेडचे मुळ नाव नवदंडी होते. ते 9 ऋषीचे निवासस्थान होते. त्याच्या अपभ्रंशातून नांदेड हे नाव पडले असावे किंवा या क्षेत्रावर नंद घराण्याची सत्ता होती म्हणून पूर्वी नांदेडला नंदीग्राम म्हटले जायचे. त्याच्या अपभ्रंशातून नांदेड

म्हटले जात असावे. हा प्रदेश आंध्रभृत्य, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, खिलजी, बहामनी व तद्नंतर मोगल या सत्तांच्या अंमलाखली आला. 18 सप्टेबर, 1948 रोजी निजामाने शरणागती पत्करून भारतातील विलीनीकरणास मान्यता दिली. एक मे 1960 रोजी नांदेडला जिल्हयाचे स्थान प्राप्त झाले. [11]

नांदेड जिल्हा हा मराठवाडयातील एक ऐतिहासिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. गोदावरी नदी या शहरापासून वाहत असल्यामुळे तसेच शिख धर्माचे खालसा पंथाचे शेवटचे धर्मगुरू श्री. गुरूगोविंदसिंघजी यांचे स्मरणार्थ बांधण्यात आलेला गुरुव्दारा हा येथे असल्याने या जिल्हयाचे देशाच्या नकाशात महत्वाचे स्थान प्राप्त केले आहे. नांदेड जिल्हा दक्षिण भारताच्या पठारी भागात आहे. या जिल्हयात दक्षिणेकडील भाग हलकी माळरान जमीन असल्यामुळे हा भाग थोडा वेगळा आहे. किनवट तालुक्यातील उत्तरपुर्व भाग डोंगराळ,बंजर व शेतीसाठी अयोग्य जमीन असल्यामुळे हा भाग थोडा वेगळा व मागासलेला आहे. जिल्हयाच्या उर्वरीत भागात मध्यम, सपाट, सुपीक व काळी जमीन आहे. त्यामुळे नांदेड जिल्हयात वेगवेगळया प्रकारची पीके घेतली जातात. नांदेड जिल्हयात कुष्णूर या गावी औद्योगिक वसाहत निर्माण झाली आहे, त्यामुळे उद्योगधंद्याचे प्रमाणही वाढत आहे. [12]

### 3-5-1 स्थान व क्षेत्रफळ

महाराष्ट्रात आग्नेय दिशेस हा जिल्हा असून नांदेडच्या पश्चिमेला लातूर आणि परभणी उत्तरेस यवतमाळ, हिंगोली हे जिल्हे आहेत. दक्षिणेस कर्नाटक आणि पूर्वेस आंध्रप्रदेश राज्य आहेत. बीदर जिल्हा हा नांदेडच्या कर्नाटकातील शेजारी असून आदिलाबाद व निझामाबाद हे जिल्हे आंध्र प्रदेश राज्याच्या शेजारी आहेत.

प्राकृतिक रचनेत नांदेड जिल्हयांचे तीन भाग पडतात. उत्तरेकडील डोंगराळ भाग, गोदावरी नदी, किनारपट्टीचा भाग आणि बालाघाटाचा डोंगराळ भाग. याशिवाय प्रशासकीय सोयीसाठी नांदेड जिल्हयाचे तीन उपविभाग केले आहेत ते नांदेड, देगलूर, किनवट असे आहेत. नांदेड जिल्हयांचे क्षेत्रफळ 10528 चौ.कि.मी. असून जिल्हयांची लोकसंख्या 28,68,158 लाख आहे. जिल्हयांत एकूण 16 तालुके आहेत.

### 3.5.2 लोकसंख्या

नांदेड जिल्हयांची लोकसंख्या इ.स. 2001 च्या जनगणनेनुसार 28,68,158 लाख आहे. नांदेड जिल्हयांचे क्षेत्रफळ 10,528 चौ.कि.मी.आहे, ते राज्याच्या क्षेत्राच्या 3.42 टक्के एवढे आहे. या जिल्हयाचे मुख्यालय हे नांदेड हेच आहे. 2001 च्या जनगणनेनुसार पुरूषांचे प्रमाण 14,76,301 लाख आहे तर स्त्रियांचे प्रमाण 13,91,857 लाख आहे. नांदेड शहराची लोकसंख्या 4.5 लाख आहे. [13]

**सारणी क्र. 3.3**

**नांदेड जिल्हयांची लोकसंख्या**

| अ.क्र. | विवरण | महिला | टक्केवारी | पुरूष | टक्केवारी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शहरी | 2.42 | 10.38 | 2.64 | 11.34 | 05.66 | 21.72 |
| 2 | ग्रामीण | 8.91 | 38.24 | 9.33 | 40.04 | 18.24 | 78.28 |
| | **एकूण** | **11.33** | **48.62** | **11.97** | **51.38** | **23.90** | **100.00** |

संदर्भ स्त्रोत :- 2001 च्या जनगणनेनुसार

वरील सारणी क्र. 3.3 वरू न 2001 च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्हयांची एकूण लोकसंख्या 23.90 लक्ष असून त्यापैकी 5.06 (21.72 %) शहरी

लोकसंख्या आहे. तर 18.24 लक्ष (78.28%) एवढी ग्रामीण लोकसंख्या आहे. एकूण लोकसंख्येपैकी स्त्रियांची संख्या 11.33 लक्ष (48.62%) एवढी तर पुरूषांची संख्या 11.97 लक्ष (51.38%) इतकी आहे. त्यापैकी शहरी भागात स्त्रियांची संख्या 2.42 लक्ष (10.38%) तर ग्रामीण भागात स्त्रियांची संख्या 8.91 लक्ष (38.34%) इतकी आहे. पुरूषांची संख्या शहरी भागात 2.64 लक्ष (11.34%) तर ग्रामीण भागात 9.33 लक्ष (40.04%) इतकी आहे. नांदेड जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी पुरुषांचे प्रमाण हे स्त्रियांच्या प्रमाणाच्या तुलनेत जास्त आहे."

**सारणी क्र. 3.4**

**नांदेड जिल्हयांतील विविध धर्मानुसार लोकसंख्या**

| अ.क्र. | धर्म | लोकसंख्या (लाखात) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | हिंदू | 17.91 | 76.88 |
| 2 | बौध्द | 2.40 | 10.30 |
| 3 | मुस्लिम | 2.84 | 12.30 |
| 4 | ख्रिश्चन | 0.01 | 0.04 |
| 5 | जैन | 0.04 | 0.17 |
| 6 | शिख | 0.08 | 0.34 |
| 7 | इतर | 0.02 | 0.08 |
| | **एकूण** | **23.30** | **100.00** |

संदर्भ स्त्रोत :- 2001 च्या जनगणनेनुसार

**आलेख क्र. 3.3**

**नांदेड जिल्हयांतील विविध धर्मानुसार लोकसंख्या दर्शविणारा आलेख**




वरील सारणीनुसार, 2001 च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्हयातील 1-हिंदूची लोकसंख्या 17.91 लक्ष (76.88%), 2- बौध्द 2.40 लक्ष (10.30%), 3-मुस्लीम लोकसंख्या 2.84 लक्ष (12.19%), 4-ख्रिश्चन 0.01 लक्ष (0.04%), 5-जैन 0.04 लक्ष (0.17%), 6-शिख 0.08 लक्ष (0.34 %) व 7-इतर 0.02 लक्ष (0.08%) आहे. नांदेड जिल्हयांत सर्वात जास्त लोकसंख्या हिंदू धर्मियांची असून सर्वात कमी लोसंख्या ख्रिश्चन धर्मीयांची आहे.

## सारणी क्र. 3.5
## नांदेड जिल्हयातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या

| अ.क्र. | तालुका | ग्रामीण | नागरी | स्त्री | पुरूष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | उमरी | 75021 | 11151 | 42359 | 43813 | 86172 |
| 2 | धर्माबाद | 56395 | 29936 | 42750 | 43581 | 86331 |
| 3 | माहूर | 86729 | _ | 42024 | 44705 | 86729 |
| 4 | हिमायतनगर | 88908 | | 43306 | 45602 | 88908 |
| 5 | मुदखेड | 78618 | 18704 | 47211 | 50111 | 97322 |
| 6 | अर्धापूर | 98635 | _ | 47826 | 50809 | 98635 |
| 7 | भोकर | 119155 | _ | 58221 | 60934 | 119155 |
| 8 | बिलोली | 125940 | 27785 | 75071 | 78660 | 153731 |
| 9 | नायगाव | 160944 | _ | 78113 | 82831 | 160944 |
| 10 | देगलूर | 152558 | 48024 | 97845 | 102737 | 200582 |
| 11 | कंधार | 185608 | 20725 | 99381 | 106952 | 206333 |
| 12 | लोहा | 187272 | 20135 | 100805 | 106602 | 207407 |
| 13 | किनवट | 185680 | 867 | 103090 | 107458 | 210547 |
| 14 | हदगाव | 200086 | 23328 | 108614 | 114791 | 223408 |
| 15 | मुखेड | 217030 | 25936 | 118210 | 124776 | 223408 |
| 16 | नांदेड | 160702 | 438266 | 287031 | 311937 | 598965 |
| | **एकूण** | **2179301** | **688857** | **1391857** | **1476301** | **2868158** |

संदर्भ स्त्रोत :- 2001 च्या जनगणनेनुसार

लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य भारतात दुसऱ्या क्रमांकावर आहे. नांदेड जिल्हयांची लोकसंख्या 2868158 एवढी आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येचा विचार केल्यास राज्यातील 2.98% लोकसंख्या नांदेड जिल्हयांत आहे. जिल्हयातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास 76% लोक ग्रामीण भागात तर 24% लोकसंख्या शहरी भागात आहेत. नांदेड जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी 1476301 पुरूष  1391857 स्त्रिया आहेत. नांदेड जिल्हयांतील

तालुकावार एकूण लोकसंख्या, ग्रामीण व शहरी लोकसंख्या वरील सारणीत दिली आहे.

**सारणी क्र. 3.6**

**स्त्री - पुरुष साक्षरता प्रमाण**

| अ.क्र. | वर्ष | स्त्री साक्षरतेचे प्रमाण | पुरुष साक्षरतेचे प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | 2001 | 52.10 | 75.80 |
| 2 | 2011 | 61.46 | 82.14 |

स्त्रोत :- 2011 च्या जनगणनेनुसार

**आलेख क्र. 3.4**

**स्त्री - पुरुष साक्षरता प्रमाण दर्शविणारा आलेख**




वरील सारणी क्र. 3.6 नुसार असे दिसून येते की, भारतातील स्त्री-पुरूष साक्षरता दर दर्शविला आहे. 2001 स्त्रीयांचे साक्षरतेचे प्रमाण 52.10 एवढे होते तर पुरुषाचे साक्षरतेचे प्रमाण 75.80 एवढे होते. 2011 स्त्रीयांचे साक्षरतेचे प्रमाण 61.46 तर पुरुषाचे साक्षरतेचे प्रमाण 82.14 एवढे आहे. पुरूषाचे साक्षरतेचे प्रमाण स्त्रीयांपेक्षा जास्त आहे.

**सारणी क्र. 3.7**

नांदेड जिल्हयांतील साक्षरता प्रमाण दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | विवरण | स्त्री | टक्केवारी | पुरुष | टक्केवारी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शहरी | 1.07 | 12.08 | 1.72 | 19.41 | 2.79 | 31.49 |
| 2 | ग्रामीण | 1.69 | 19.07 | 4.38 | 49.44 | 6.07 | 68.51 |
| | एकूण | 2.76 | 31.15 | 6.10 | 68.85 | 8.86 | 100.00 |

संदर्भ स्त्रोत :- महाराष्ट्र शासन 2004 नांदेड जिल्हा आर्थिक व सामाजिक विश्लेषण प्रकाशन विभाग मुंबई

वरील सारणी क्र. 3.7 वरून असे दिसून येते की, नांदेड जिल्हयांची एकूण साक्षरांची संख्या 8.86 लक्ष असून एकूण लोकसंख्येच्या 38.03 एवढे आहे. एकूण लोकसंख्येपैकी स्त्री साक्षरांची संख्या 2.76 लक्ष (32.15%) असून ग्रामीण साक्षरांची संख्या 6.07 लक्ष (68.51%) आहे.

### 3.5.3 हवामान :

नांदेड जिल्हयाचे हवामान विषम व कोरडे आहे. जिल्हयातील सरासरी तापमान $42^0$ ते $43^0$ सेल्सीअस असते. नांदेड जिल्हयातील पर्जन्यमान सरासरी 897.08 मि.मि. इतके असते. नांदेड जिल्हयातील सरासरी पावसाचे प्रमाण 47 दिवस इतके असते. [14]

### 3.5.4 नद्या व धरणे :

गोदावरी, पैनगंगा, मांजरा, मन्याड नांदेड जिल्हयातील या महत्ववाच्या नद्या आहेत. गोदावरी नदीची लांबी या जिल्हयातील 140 कि.मी. आहे. मांजरा नदी गोदावरी नदीला मध्यभागात येवून मिळते. मांजरा नदीला मन्याड नदी

येवून मिळते. लेंडी नदी लातूर जिल्हयात उगम पावून देगलूर तालुक्यातून वाहते व मांजरा नदीस मिळते.

नांदेड जिल्हयाच्या उत्तर सीमेवरून पैनगंगा नदी वाहते. कयाधू ही पैनगंगेची उपनदी हदगाव तालुक्यातून वाहते. पैनगंगा विदर्भ व मराठवाडयाची सीमा ठरविणारी नदी असून कयाधू ही तिची उपनदी आहे. ती हदगाव तालुक्यातून वाहते. इस्लापूर या गावाजवळ पैनगंगेवर सहस्त्रकुंड नावाचा प्रसिध्द धबधबा आहे.

कंधार तालुक्यात मन्याड नदीवर वरवंट, मुखेड तालुक्यात कुंदाळा येथे धरण आहे. करडखेड येथे एक लहान प्रकल्प आहे. लेंडी नदीवर पेठवडज व महालिंगी येथे मध्यम प्रकल्प आहे. किनवट तालुक्यात नागझरी व डोंगरगाव येथे तलाव आहेत. गोदावरी नदीवर विष्णुपूरी प्रकल्प आहे. त्याचे सध्याचे नाव 'शंकरराव चव्हाण विष्णुपूरी प्रकल्प' आहे.

**3.5.5 जमीन**

नांदेड जिल्हयातील जमीन काळी व सुपीक आहे. तिच्यात ओलावा टिकवण्याची क्षमता आहे. जिल्हयांत जमीनीचे स्वरूप वेगवेगळे आहे. जमीनीच्या उंचसखल भागावरून प्राकृतिक रचनेचे तीन विभाग पडतात.

**प्राकृतिक विभाग**

**उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश :-** जिल्हयातील किनवट, माहूर, हदगाव, हिमायतनगर, भोकर तालुक्याचा भाग या विभागात येतो.

**गोदावरी नदीचे खोरे :-** गोदावरी नदी नांदेड, धर्माबाद, लोहा, नायगांव, बिलोली, उमरी, देगलूर या तालुक्यांना सुपीक बनवते.

**बालाघाटाचा डोंगराळ प्रदेश :-** कंधार, मुखेड हे तालुके प्रामुख्याने या विभागात मोडतात. देगलूर तालुक्याचा दक्षिणेकडील भाग या विभागात येते.

## 3.6 वनसंपत्ती :-

माहूर व किनवट हे दोन तालुके घनदाट जंगलांने व्यापलेले आहे. हिमायतनगर व भोकर तालुक्यात कमी जंगले आहेत. या वनात सागाची झाडे जास्त आढळतात, तेंदू, मोहाचे वृक्ष व बांबू आढळतात. या वनात हरीण, कोल्हा, तरस व अस्वल हे प्राणी व अनेक पक्षीही आढळतात. किनवट जवळच्या अभयअरण्यात बिबटया, वाघ, हरीण, अस्वल, मोर यांना संरक्षण मिळत आहे. देगलूर, मुखेड व कंधार तालुक्यात गवताची कुरणेही आहेत. [15]

**पिके :-** नांदेड जिल्हयांतील काही महत्वाची पिके खालील प्रमाणे आहेत.

**ज्वारी** :- ज्वारी हे नांदेड जिल्हयांतील महत्वाचे खरीप व रब्बी असे महत्वाचे पिक आहे. मुखेड तालुक्यात खरीप व रब्बी असे दोन्ही प्रकारची ज्वारी घेतली जाते. हदगाव, किनवट व कंधार हे तालुके खरीप तर देगलूर, नायगांव व बिलोली हे रब्बी पिकांचे तालुके आहेत.

**गहू :-** जिल्हयात सर्वत्र गहू कमी अधीक-प्रमाणात घेतला जातो. नांदेड, हदगांव, मुदखेड, हिमायतनगर, बिलोली या तालुक्यात गहू जास्त प्रमाणात घेतला जातो.

**तांदूळ :-** हे पीक बिलोली, नांदेड, किनवट, माहूर, हदगांव या तालूक्यात घेतले जाते.

**तूर :-** जिल्हयात सर्वत्र कमी जास्त प्रमाणात तूर पीक घेतले जाते.

**मुग** :- देगलूर, मुखेड, किनवट, माहूर, हदगाव या तालुक्यात मुगाचे पीक मोठया प्रमाणत घेतले जाते.

**केळी :-** अर्धापूर व हदगाव हे तालुके केळी उत्पादनात आघाडीवर आहेत.

### 3.7 उद्योग

नांदेड जिल्हयात छोटे व मोठे उद्योग आहेत. काही प्रमुख उद्योग पुढीलप्रमाणे

**मोठे उद्योग :-**

**कापड उद्योग :-** सुतापासून कापड तयार करणारी मील नांदेड येथे आहे.

**साखर कारखाने :-** नांदेड जिल्हयात उसाचे उत्पादन मोठया प्रमाणावर होते. त्यामुळे उसापासून साखर बनविणारे पुष्कळ कारखाने या जिल्हयात आहेत. काही साखर कारखाने चालू आहेत तर काही कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

**छोटे उद्योग :-**

**हातमाग व यंत्रमाग :-** हातमाग व यंत्रमाग या दोन्ही मागावर धोतरे, साडया विणण्याचा उद्योग जिल्हयात चालतो. धर्माबाद, मुखेड, कंधार, देगलूर, कुंडलवाडी व नांदेड या तालुक्यात इतर तालुक्याच्या तुलनेत जास्त प्रमाणात चालतो. लाकूड कटाईचे कारखाने किनवट येथे आहेत. किनवट, नांदेड व कंधार येथे कातडी कमावण्याचाही उद्योग चालतो. [16]

### 3.8 नांदेड जिल्हयातील महत्वाची प्रमुख ठिकाणे

**नांदेड :-**

नांदेड हे मराठवाडयातील एक महत्वाचे शैक्षणिक केंद्र आहे. 1994 ला स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. नांदेड शहर एक व्यापारी पेठ असून येथे कापूस संशोधन केंद्र आहे. येथे शिखांचे दहावे गुरू गोविंदसिघजी यांची समाधी आहे. विष्णुपूरी प्रकल्प तसेच कापूस आणि केळी संशोधन केंद्रही आहे.

**कंधार :-**

कंधार हे तालुक्याचे ठिकाण असून याचे प्राचीन नांव खंदार होते. या ठिकाणी सापडलेल्या अवशेषांवरून ही राष्ट्रकुटांची राजधानी होती असे मानले जाते. कंधार गावाला लागूनच रामेश्वर तिसरा या राष्ट्रकुट राजाच्या काळात बांधला गेलेला भुईकोट किल्ला आहे. कंधार जवळच मन्याड नदीवर वरंवट येथे धरण बांधण्यात आले आहे. येथे जवळच पंडीत नेहरू उद्यान आहे. [17]

**माहूर :-**

माहूरच्या गडावर रेणूका देवीचे मंदीर आहे. रेणूकादेवीचे हे स्थान देवीच्या साडेतीनपीठापैकी एक मानले जाते. या ठिकाणी कर्नाटक, आंध्रप्रदेश इत्यादी राज्यातून हजारो लोक दर्शनासाठी येतात. माहूर येथे जंगल असून जंगली प्राणी येथे आढळतात. माहूर तालुक्यातील उनकेश्वर येथे गरम पाण्याचे झरे असलेले ठिकाण आहे. [18]

**किनवट :-**

किनवट हे पूर्णा-आदिलाबाद या लोहमार्गावर वसलेले आहे. हे तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. पैनगंगा खोऱ्यात असलेले किनवट अभयारण्य हे पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र बनले आहे.

**भोकर :-**

भोकर हे तालुक्याचे ठिकाण असून येथे यादवपूर्व काळातील तलावाच्या काठावरील सुंदरसे महादेव मंदीर आहे. कलावंतिणीचा महाल आहे. [19]

**बिलोली :-**

बिलोली हे तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. येथील जुन्या मशिदीवरील काळया पाषणातील साखळया व घुंगराचे कोरीव काम पाहण्यासारखे आहे. औरंगजेबकालीन मशिद असून त्यांच्या सैन्यातील एक अधिकारी हजरत नवाज सरफराज खान यांची दर्गा या मशिदीमध्ये आहे.

**देगलूर :-**

देगलूर हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून महत्वाचे व्यापारी केंद्र आहे. नांदेड जिल्हयाच्या दक्षिणेकडील हे तालुक्याचे ठिकाण आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्याच्या सिमेवर लेंडी नदीच्या काठी वसलेले आहे.

**माळेगाव :-**

नांदेड जिल्हयात लोहा तालुक्यात माळेगाव हे गाव आहे. दक्षिण भारतातील सर्वात मोठी यात्रा येथे भरते. मल्हारी म्हाळसाकांताचे भव्य मंदीर आहे. येथील यात्राचे वैशिष्टये म्हणजे येथे पशु, अश्व, उंट व गाढवाच्या खरेदी विक्रीची प्रचंड उलाढाल होते. याशिवाय येथे प्राण्यांच्या शर्यतीही होतात. पाच दिवस यात्रा भरते. या ठिकाणी विविध राज्यांतून भाविक व व्यापारी येतात.

**हदगाव :-**

हदगाव हे एक तालुक्याचे ठिकाण आहे. या तालुक्यातील तामसा या गावापासून पूर्वेस चौदा कि.मी. अंतरावर दाट जंगलात केदारनाथाचे मंदीर आहे. हे मंदीर अतिशय प्राचीन असून येथे महादेवाची स्वयंभू पींड आहे. तसेच या तालुक्यातील पैनगंगाच्या काठावर शिउर नावाचे छोटेसे खेडे आहे. खोदकाम वाकाटाक झालेले असून येथील लेणी वैष्णव धर्मीय आहेत. [20]

**मुदखेड :-**

मुदखेड हे तालुक्याचे ठिकाण आहे. येथे लोहमार्गाचे जंक्शन स्टेशन असून आदिलाबाद व हैद्रबाद या दोन मोठया शहराला जोडणारा लोहमार्ग आहे. तसेच केंद्रीय राखीव पोलीस-दलाचे प्रशिक्षण केंद्रही आहे.

**अर्धापूर :-**

अर्धापूर हे तालुक्याचे ठिकाण आहे. येथे हेमांडपंथी व केशवराज मठ आहे. येथे दर्गाही आहे. डोंगरकडा येथे महादेवाचे प्रसिध्द मंदिर असून येथे महाशिवरात्रीला उत्सव असतो.

**नायगाव :-**नायगाव हे नांदेड-हैद्राबाद या मार्गावर आहे. हे एक तालुक्याचे ठिकाण आहे. येथे व्यापाऱ्याची मोठी बाजारपेठ आहे. येथे जनावरांचा बाजार भरतो तो फार प्रसिध्द आहे.

**धर्माबाद** :-

धर्माबाद हे तालुक्याचे ठिकाण असून आंध्रप्रदेशाच्या सिमेजवळ हा तालुका असल्यामुळे येथे मराठी व तेलगू भाषा बोलली जाते. जवळच पंधरा कि. मी. अंतरावर विद्येची देवता सरस्वतीचे मंदिर बासर येथे आहे.

### 3.9 नांदेड जिल्हयातील उच्च शिक्षण :-

औरंगाबाद मराठवाडा विद्यापीठाची स्थापना इ.सन. 1958 मध्ये झाली. या विद्यापीठाचे उपकेंद्र नांदेड येथे 17 सप्टेंबर 1994 रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची सुरूवात करण्यात आली. या विद्यापीठाची भव्य व देखणी वास्तू विष्णुपूरी येथे उभारण्यात आली. या विद्यापीठाचे वैशिष्टये म्हणजे मान्यता मिळाल्यापासून तीन वर्षात अनुदान आयोगाने विद्यापीठाची सखोल तपासणी केली व विद्यापीठास अनुदानास पात्र ठरले. केवळ तीन वर्षात मान्यता मिळवणारे भारतातील हे एकमेव विद्यापीठ आहे.

या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र नांदेड, परभणी, लातूर हे तीन जिल्हयापुरते राहील असे विद्यापीठ स्थापनेच्या वेळी ठरविण्यात आले होते. हिंगोली जिल्हा हा परभणी जिल्हयांचे विभाजन झाल्यामुळे  निर्माण झाला. आता या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर अशा चार जिल्हयात आहे. विद्यापीठात सध्या 182 महाविद्यालये कार्य करीत आहे. यामध्ये कला,

वाणिज्य, विज्ञान, सामाजिकशास्त्रे, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र या 9 विद्याशाखांचा समावेश आहे.

**सारणी क्र. 3.8**

## नांदेड जिल्हयातील महाविद्यालये

| अ. क्र. | विद्याशाखा | नांदेड जिल्हयांत | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | विज्ञान | 20 | 50 |
| 2 | वाणिज्य | 20 | 53 |
| 3 | कला | 35 | 105 |
| | **एकूण** | **85** | **208** |

यापैकी 59 महाविद्यालयात पदव्युत्तर अध्यापन केले जाते. औषध निर्माणशास्त्र व वैद्यकीय महाविद्यालयाची संख्या दहा असून त्यापैकी चार नांदेड जिल्हयात आहेत. शिक्षण आणि शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची संख्या 33 असून त्यापैकी अकरा नांदेड जिल्हयांत आहेत. सात विधी महाविद्यालयापैकी चार नांदेड जिल्हयात आहेत. विद्यापीठ परिसरात असलेल्या दहा संकुलाव्दारे पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यात निरनिराळे अभ्याक्रम सुरू आहेत.

विद्यापीठाने 250 पेक्षा अधिक संशोधन मार्गदर्शकांना मान्यता दिली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विषयात संशोधन कार्य चालते. विद्यार्थ्यासाठी विविध योजना राबविल्या जातात. ज्यामुळे विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास होईल. जसे राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा विभाग, कमवा आणि शिका योजना बहि:शाल शिक्षण मंडळ इत्यादी. तसेच जिल्हयांत तंत्र शिक्षणासाठी

औद्यागिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन आणि अभियात्रिकी महाविद्यालये उपलब्ध आहेत.

**संदर्भ ग्रंथ**


1. डॉ. कठारे/ डॉ. नगराळे , 'मराठवाडयाचा इतिहास ', कल्पना प्रकाशन, शिवाजीनगर नांदेड. नोव्हेबर 1999, पृ.क्र.9,29,30.
2. डॉ. कठारे/ डॉ. नगराळे,'मराठवाडयाचा इतिहास', कल्पना प्रकाशन, शिवाजीनगर नांदेड. नोव्हेबर 1999, पृ.क्र. 311.
3. वर्षा मेश्राम, 'महाराष्ट्रातील जिल्हे', पाचघरे प्रकाशन, नवदीप प्रिंटर्स ग्रूप, नागपूर. जानेवारी 2010 पृ. क्र. 38,39.
4. संपादक तुकाराम जाधव, 'महाराष्ट्र वार्षिकी', द युनिक ॲकाडमी पुणे- 2010, पृ. क्र.572, 573, 574.
5. संपादक तुकाराम जाधव, 'महाराष्ट्र वार्षिकी', द युनिक ॲकाडमी पुणे-२०१०, पृ. क्र.586, 587.
6. संपादक तुकाराम जाधव, 'महाराष्ट्र वार्षिकी', द युनिक ॲकाडमी पुणे-2010, पृ. क्र.590.
7. वर्षा मेश्राम, 'महाराष्ट्रातील जिल्हे', पाचघरे प्रकाशन, नवदीप प्रिंटर्स ग्रूप, नागपूर- जानेवारी,2010, पृ. क्र. 69,70.
8. वर्षा मेश्राम, 'महाराष्ट्रातील जिल्हे', पाचघरे प्रकाशन, नवदीप प्रिंटर्स ग्रूप, नागपूर- जानेवारी, 2010, पृ. क्र. 43.

9. के सागर, ‘महाराष्ट्रातील जिल्हे’, पब्लिकेशन पुणे-2006, पृ. क्र. 169.

10. संपादक तुकाराम जाधव, ‘महाराष्ट्र वार्षिकी’, द युनिक ॲकाडमी पुणे-2010, पृ. क्र. 594, 595.

11. के सागर, ‘महाराष्ट्रातील जिल्हे’, पब्लिकेशन पुणे-2011, पृ. क्र. 169.

12. संपादक तुकाराम जाधव, ‘महाराष्ट्र वार्षिकी’, द युनिक ॲकाडमी पुणे-2010, पृ. क्र. 580, 581.

13. रा. नी. देशमुख, ‘आपला नांदेड जिल्हा’, कल्पना प्रकाशन, आय. टी. आय.नांदेड- जानेवारी, 2008, पृ. क्र. 5.

14. वर्षा मेश्राम, ‘महाराष्ट्रातील जिल्हे’, पाचघरे प्रकाशन, नवदीप प्रिंटर्स ग्रूप, नागपूर-जानेवारी- 2010, पृ. क्र. 60.

15. रा. नी. देशमुख, ‘आपला नांदेड जिल्हा’, कल्पना प्रकाशन, आय. टी. आय.नांदेड- जानेवारी, 2008, पृ. क्र. 10.

16. संपादक तुकाराम जाधव, ‘महाराष्ट्र वार्षिकी’, द युनिक ॲकाडमी पुणे-2010, पृ. क्र. 582.

17. वर्षा मेश्राम, ‘महाराष्ट्रातील जिल्हे’, पाचघरे प्रकाशन, नवदीप प्रिंटर्स ग्रूप, नागपूर-जानेवारी- 2010, पृ. क्र. 17.

18. रा. नी. देशमुख, ‘आपला नांदेड जिल्हा’, कल्पना प्रकाशन, आय. टी. आय.नांदेड- जानेवारी, 2008, पृ. क्र. 9,10,11,12,13,14,15.

19. वर्षा मेश्राम, ‘महाराष्ट्रातील जिल्हे’, पाचघरे प्रकाशन, नवदीप प्रिंटर्स ग्रूप, नागपूर-जानेवारी- 2010, पृ. क्र. 60,61.

20. रा.नी. देशमुख, ‘आपला नांदेड जिल्हा’, कल्पना प्रकाशन, आय. टी. आय.नांदेड-जानेवारी, 2008, पृ. क्र. 17,22.